जा.क्र.कबचौउमवि/७-अ /कोरोना/१६२५/२०२० दि.०१/०४/२०२०

प्रति,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयांचे मा.प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक

**विषय :- माहे ऑक्टो./नोव्हें./डिसें.२०१९ मधील परीक्षेच्या प्रथम/द्वितीय/तृतीय वर्ष अभियांत्रिकी वर्गाच्या उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून अनुषंगाने कळविण्यात येते की, माहे ऑक्टो./नोव्हें./डिसें.२०१९ मध्ये आयोजित केलेल्या प्रथम/द्वितीय/तृतीय वर्ष अभियांत्रिकी वर्गाच्या परीक्षेच्या उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रती मागणीसाठी ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज सादर केलेले होते, अशा विद्यार्थ्यांच्या छायांकित प्रती ह्या महाविद्यालये सुरू झाल्यावर उपलब्ध करून देण्यात येतील.

तसेच अंतीम वर्ष अभियांत्रिकी (BE) वर्गाचे जे विद्यार्थी महाविद्यालये बंद असल्यामुळे पुनमूल्यांकनाकरीता (Challenge to Valuation/Redressal) अर्ज सादर करु शकले नाहीत, त्या विद्यार्थ्यांना महाविद्यालये सुरू झाल्यानंतर अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात येईल, याची नोंद घ्यावी. सदर बाब आपल्या अधिनस्थ संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

( भ. प्र. पाटील )
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत-प्रसिध्दीसाठी.

जनसंपर्क अधिकारी,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव

२/- कृपया, वरील पत्रातील आशय बातमीरुपाने जळगाव,धुळे व नंदूरबार जिल्ह्यातील वृत्तपत्रात प्रसिध्दीस द्यावा.